दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 30 जुलै 2026 | अंक क्र. 83 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

"आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल"

हॉटेल बालाजी

ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.



# राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या 130 व्या जयंतीनिमित्त परळीतील श्री संत भगवान बाबा चौक येथे केले भगवान बाबांना अभिवादन

## समाजप्रबोधनासाठी शिक्षण हाच खरा मार्ग भगवान बाबांचे विचार आजही प्रेरणादायी - पाटलोबा (दादा) मुंडे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

**राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या 130 व्या जयंतीनिमित्त परळी वैजनाथ येथील राष्ट्रसंत भगवान बाबा महाराज चौकात बुधवार (दि. 29 जुलै) रोजी अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.**









या प्रसंगी श्रीहरी कांदे जिरेवाडी उत्त, उत्तम पाटलोबा मुंडे इंदपवाडी, गोविंद वनवे, गोपाळ कांबळे, राजेभाऊ श्रीधर मुंडे कन्हेरवाडी, सावन मुंडे (आमदार रघुनाथराव मुंडे विचार मंच, कन्हेरवाडी), मुक्ताराम गवळी ज्येष्ठ नेते, संपादक नितीन ढाकणे, फुले आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना उत्तम पाटलोबा मुंडे म्हणाले की, "राष्ट्रसंत भगवान बाबा यांनी समाजातील अंधश्रद्धा, जातीभेद आणि अनिष्ट रूढी-परंपरांवर आपल्या कीर्तनातून प्रभावी प्रहार केला. समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचवले. त्यांचे विचार आजही समाजाला योग्य दिशा देणारे असून प्रत्येकाने त्यांच्या शिकवणीचा आदर्श घ्यावा."

कार्यक्रमात उपस्थितांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या सामाजिक, शैक्षणिक व प्रबोधनात्मक कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

# संतोष सानप यांना 'समाजरत्न' पुरस्कार जाहीर; नाशिक येथे होणार गौरव

**आष्टी | प्रतिनिधी**

वंजारी सेवा संघ आणि न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था (महाराष्ट्र राज्य) यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा या वर्षाचा प्रतिष्ठित 'वंजारी समाजरत्न पुरस्कार' दैनिक लोकाशाचे आष्टी तालुका प्रतिनिधी तथा आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप यांना जाहीर झाला आहे. पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात येत आहे.

गेल्या २३ वर्षांपासून संतोष सानप हे पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात अत्यंत सक्रियपणे योगदान देत आहेत. समाजातील वंचित, शोषित व उपेक्षित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडत त्यांनी अन्यायाविरोधात सदैव आपला रोखठोक आवाज उठवला आहे. पत्रकारितेचे माध्यम हे केवळ बातम्यांपुरते मर्यादित न ठेवता, त्याद्वारे गोरगरिबांना न्याय मिळवून देणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे हीच त्यांची खरी ओळख राहिली आहे. त्यांच्या



याच दीर्घकालीन आणि तळमळीच्या सामाजिक-पत्रकारिक योगदानाची दखल घेऊन त्यांना या पुरस्कारासाठी निवडण्यात आले आहे. हा पुरस्कार सोहळा रविवार, दिनांक ९ ऑगस्ट २०२६ रोजी नाशिक येथे भव्य दिव्य वातावरणात संपन्न होणार आहे. राज्यभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या शुभहस्ते आणि समाजबांधवांच्या उपस्थितीत संतोष सानप यांना हा 'समाजरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविले जाणार आहे.

# सिरसाळ्यात ३१ जुलै रोजी कै . वसंतराव नाईक जयंती महोत्सवाचे आयोजन

## धर्मगुरु बाबुसिंग महाराज, मंत्री पंकजाताई मुंडे,आ .धनंजय मुंडे यांच्यासह दिग्गजांची लागणार उपस्थिती

**सिरसाळा अतुल बडे** : हरित क्रांतीचे प्रणेते,महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री,कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त परळी तालुक्यातील सिरसाळा येथे शुक्रवार, दिनांक ३१ जुलै रोजी सकाळी १० वाजता एका ऐतिहासिक, भव्य जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.सकल बंजारा समाज, परळी वैजनाथ यांच्या वतीने हा भरगच्च कार्यक्रमांचा सोहळा आयोजित करण्यात आला असून, बीड जिल्ह्यातील बंजारा बांधवांमध्ये या निमित्ताने मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या ऐतिहासिक सोहळ्याची सुरुवात एका भव्य सांस्कृतिक रॅलीने होणार असून, ही रॅली पोहनेर पॉईंट (राठोड हॉस्पिटल) येथून सुरू होऊन सिरसाळ्यातील वसंतराव नाईक चौकापर्यंत काढण्यात येईल, ज्यामध्ये बंजारा समाजाच्या पारंपारिक संस्कृतीचे, वेशभूषेचे आणि लोककलांचे दर्शन घडवले जाणार आहे. रॅलीच्या समापनानंतर अनुसया मंगल कार्यालय,



सिरसाळा येथे मुख्य सोहळा पार पडेल, ज्याला मार्गदर्शक म्हणून बंजारा समाजाचे श्रद्धेय धर्मगुरू बाबुसिंग महाराज उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे आणि माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्यासह पुसद च्या नगराध्यक्षा मोहिनीताई इंद्रनील नाईक, माजी सेवानिवृत्त जिल्हाधिकारी बळीराम पवार,अजय मुंडे सिरसाळा सरपंच शेख नशीब

हे मान्यवर एकाच मंचावर उपस्थित राहून या महोत्सवाची शोभा वाढवणार आहेत. या सोहळ्यात आपल्या कर्तृत्वाने समाजाचे नाव राज्यभरात मोठे करणाऱ्या मान्यवरांचा विशेष गौरव केला जाणार असून, यामध्ये म्हाडा कोकण चे सिईओ व बंजारा समाजाचे भूषण विशाल राठोड, लोकमत पुरस्कार प्राप्त डी. एस. राठोड आणि युवा उद्योजक विलास राठोड यांचा विशेष सत्कार केला जाईल. हा सोहळा बंजारा समाजाच्या एकतेचे प्रतीक ठरणार असून, बीड जिल्ह्यातील प्रत्येक तांड्यातील तमाम बंजारा बांधवांनी आणि माता-भगिनींनी या ऐतिहासिक जयंती महोत्सवास व रॅलीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे जाहीर आवाहन सकल बंजारा समाज बांधव, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.


# खोलेश्वर प्राथमिक शाळेचा विद्यार्थी अर्णव ढाकणे प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत (इ. ४ थी) पात्र!

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ४ थी) २०२६ चा अंतरिम (तात्पुरता) निकाल नुकताच प्रसिद्ध झाला असून, यामध्ये अंबाजोगाई येथील खोलेश्वर प्राथमिक शाळेचा विद्यार्थी अर्णव दत्तात्रय ढाकणे याने सुयश संपादन केले आहे. अर्णवने एकूण ३०० पैकी २४० गुण (८०.००%) मिळवून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरण्याचा मान मिळवला आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे २५ जुलै २०२६ रोजी हा निकाल जाहीर करण्यात आला. अर्णवने पहिल्या पेपरमध्ये (प्रथम भाषा व गणित) १५० पैकी १२४ गुण (८२.६६%) तर दुसऱ्या पेपरमध्ये (तृतीय भाषा व बुद्धिमत्ता चाचणी) १५० पैकी ११६ गुण (७७.३३%) मिळवत तब्बल ८० टक्के गुणांसह घवघवीत यश प्राप्त केले.

अर्णव दत्तात्रय ढाकणे खोलेश्वर प्राथमिक शाळा, अंबाजोगाई (जि. बीड) मिळालेले गुण: २४० / ३००



(शेकडा गुण: ८०.००%) अर्णवच्या या यशाबद्दल खोलेश्वर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, पालक आणि मित्रपरिवाराकडून त्याचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे. अर्णवच्या या यशाने त्याच्या शाळेच्या व अंबाजोगाई शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# भाजप-महायुतीची कर्जमाफी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारी; भांडवलदारांना सवलती अन् शेतकऱ्यांना आश्वासनांची खैरात!

## कर्जमाफीच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक ; सरकारने तातडीने निर्णय दुरुस्त करावा – उत्तम माने

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

भाजप आणि महायुती सरकारने शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफीची आश्वासने प्रत्यक्षात फसवी ठरली असून, कर्जमाफीच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम सरकारने केले आहे, असा घणाघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते उत्तम माने यांनी केला. देशातील बड्या भांडवलदारांना कर्जसवलती आणि कर्जमाफी देण्यासाठी सरकारकडे पैसा उपलब्ध होतो; मात्र जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करण्यासाठी सरकारकडे पैसा नाही, ही अत्यंत लाजीरवाणी बाब असल्याची टीकाही त्यांनी केली.

शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीमध्ये बँकेचे मुद्दल कर्ज, त्यावरील व्याज आणि प्रत्यक्ष कर्जमाफीची रक्कम यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचा आरोप उत्तम माने यांनी केला. त्यामुळे कर्जमाफीच्या घोषणांचा प्रत्यक्ष लाभ अनेक शेतकऱ्यांना मिळत नसून, शेतकरी पुन्हा कर्जाच्या दुष्टचक्रात अडकत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी आणि विविध शेतकरी संघटनांनी शेतकरी हिताच्या दृष्टिकोनातून राज्यभर आंदोलने केली. या आंदोलनांनंतर सरकारने दिलेली लेखी आश्वासनेही पायदळी तुडविण्यात आली आहेत. चालू बाकीतील कर्जदार शेतकरी, नव्याने कर्ज घेतलेले शेतकरी तसेच दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचे आश्वासन याबाबतही सरकारने ठोस निर्णय घेतला नसल्याचा आरोप माने यांनी केला.

शेतीपूरक उद्योगांसाठी कर्ज घेतलेल्या शेतकरी आणि कर्जदारांचाही कर्जमाफीमध्ये योग्य समावेश करण्यात आलेला नसल्याने त्यांच्यावरही आर्थिक संकट ओढवले आहे. सरकारने कर्जमाफीच्या अंमलबजावणीत केलेल्या चुका शेतकऱ्यांच्या अडचणी वाढविणाऱ्या असून, या चुका तातडीने दुरुस्त करण्याची गरज आहे, असे उत्तम माने यांनी स्पष्ट केले.

'भांडवलदारांच्या कर्जासाठी सरकारची तिजोरी खुली, मग शेतकऱ्यांसाठीच हात आखडता का?' असा सवाल उपस्थित करत माने यांनी महायुती सरकारच्या शेतकरी धोरणावर जोरदार टीका केली. शेतकरी हा देशाचा अन्नदाता असून, त्याला कर्जाच्या ओझ्याखाली दबून ठेवण्याऐवजी त्याच्या संपूर्ण कर्जमाफीचा निर्णय सरकारने तातडीने घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

शासनाने कर्जमाफी योजनेतील सर्व त्रुटी तातडीने दूर करून पात्र शेतकऱ्यांना न्याय द्यावा. अन्यथा शेतकरी हितासाठी पुन्हा एकदा तीव्र आंदोलन उभारावे लागेल, असा इशाराही राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे ज्येष्ठ नेते उत्तम माने यांनी दिला.



# ना. पंकजाताई यांच्या वाढदिवसानिमित्त 190 गरजू विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

## माऊली ग्रुप व राजेश चरखा माध्यमातून विद्यार्थ्यांना केली मदत

## दुर्गादास लांब यांच्या माध्यमातून बनकरंजा जिल्हा परिषद शाळेत कार्यक्रमाचे आयोजन





**केज | प्रतिनिधी**


ना. पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे साहेब, ( मंत्री महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन व पर्यावरण वातावरणीय बदल ) यांच्या वाढदिवसानिमित्त आगळ्यावेगळ्या आणि स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवसाच्या अनावश्यक खर्चाला फाटा देत, बीड येथील राजेशजी चरखा ( कोषाध्यक्ष, बीड शहर ) , महादेव नागरगोजे ( तालुका सरचिटणीस बीड ), अमोल वडकिले , कंडू कटले , संतोष गवळी , भालचंद्र कुलकर्णी, सुरेश खराटे , दुर्गादास लांब , यांच्या माध्यमातून ना. पंकजाताई यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना दप्तर (स्कूल बॅग) बनकरंजा जिल्हा परिषद शाळा तालुका केज या ठिकाणी मोफत वाटप करण्यात आले.

सध्या महागाईच्या काळात गरीब कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी लागणारे साहित्य खरेदी करणे कठीण जाते. हीच बाब लक्षात घेऊनदप्तर वाटप कार्यक्रमाचे आयोजन बनकरंजा येथे दुर्गादास लांब यांच्या माध्यमातून करण्यात आले या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक कुरवडे सर प्रमुख पाहुणे राजेश चरखा यांच्यासह बीड येथील माऊली ग्रुप चे सर्व पदाधिकारी व बनकरंजा गावातील प्रमुख नागरिक उपस्थित होते यांच्या राजेश चरखा व माऊली ग्रुप बीड यांच्या हस्ते जिल्हा परिषद शाळा बनकरंजा ता. केज येथील 190 विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले याप्रसंगी गावातील विष्णू शंकर नागरगोजे, यांच्यासह गावातील व परिसरातील नागरिक, मान्यवर तथा शाळेतील सर्व शिक्षक, विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्य अतिथींनी सांगितले की, "वाढदिवसावर अनावश्यक खर्च करण्यापेक्षा अशा सामाजिक उपक्रमांतर्गत गोरगरीब मुलांच्या शिक्षणाला हातभार लावणे हे अत्यंत कौतुकास्पद आहे. या उपक्रमामुळे समाजातील इतर घटकांनाही प्रेरणा मिळेल."

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रमेश चाटे सर यांनी केले, तर उपस्थित ग्रामस्थ व लहान मुलांनी वाढदिवसानिमित्त ना. पंकजाताई मुंडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

## परचुंडीच्या विकासकामांचे महापौर समीर राजूरकर यांच्याकडून कौतुक; उत्कृष्ट शेतीची केली पाहणी



**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) – परळी तालुक्यातील आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या मौजे परचुंडी येथे छत्रपती संभाजीनगरचे महापौर तथा प्रथम नागरिक श्री. समीर राजूरकर यांनी आज, बुधवार (दि. 29 जुलै) रोजी सदिच्छा भेट दिली.

यावेळी प्रेस फोटोग्राफर तथा सामाजिक कार्यकर्ते भीमाशंकर नावंदे यांच्या हस्ते महापौर समीर राजूरकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्ञानेश्वर नावंदे, सुभाष नावंदे, ज्ञानेश्वर रुपनर, गणपत भरडे, हनुमान नावंदे, गुरुलिंगअप्पा नावंदे , मदन थोरात शुभम गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भेटीदरम्यान महापौर समीर राजूरकर यांनी आदर्श गाव परचुंडीची पाहणी करून गावातील विविध विकासकामांची माहिती घेतली. तसेच येथील शेतीची पाहणी करत शेतकऱ्यांनी केलेल्या आधुनिक व उत्कृष्ट शेतीचे त्यांनी विशेष कौतुक केले. गावातील स्वच्छता, नियोजन आणि विकासाच्या दिशेने होत असलेल्या प्रयत्नांचेही त्यांनी अभिनंदन केले.

महापौरांच्या या भेटीमुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, परचुंडी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अशा भेटी प्रेरणादायी ठरतील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



**महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन मंत्री महाराष्ट्राच्या रणरागिनी मा.सौ पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबई रामटेक निवासस्थानी सत्कार करताना माजी राज्यमंत्री यशवंत सेना अध्यक्ष मा श्री बालासाहेब दोडतले.**

# पुणे माध्यमिक शिक्षण विभागात झिरो पेंडन्सीसह गुणवत्ता वाढविण्यावर भर: डॉ.भाऊसाहेब कारेकर

## महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे जिल्हा ग्रामीण व शहर सहविचार सभा संपन्न

**पुणे (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद पुणे ग्रामीण व शहर यांची माध्यमिक शिक्षणाधिकारी पुणे जिल्हा परिषद,पुणे यांच्याशी त्रैमासिक सहविचार सभा संपन्न झाली.

यावेळी पुणे जिल्ह्यातील अनेक शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी संबंधित कामांबाबत पाठपुरावा करण्यात आला.दरमहा वेतन एक तारखेला होणे,सेवापुस्तक दुय्यम प्रत कर्मचार्याला मिळणे,सेवाज्येष्ठता यादीची सत्यप्रत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मिळावी,सेवा हमी कायद्याचे पालन, प्रस्तावाचे अवलोकन करून त्यामध्ये त्रुटी असल्यास एकदाच काढण्यात याव्यात वैद्यकीय बिले,निवड श्रेणी मान्यता,सर्व प्रकारच्या वैयक्तिक मान्यता विना विलंब मिळणे,सेवानिवृत्त कर्मचारी यांचा प्रस्ताव निपटारा व त्यांचे फायनल पेमेंट विनाविलंब मिळावा, २०२१ - २२ ते २०२६-२६ या कालावधीतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पीएफ पावत्या मिळाव्या, एनपीएस धारक कर्मचाऱ्यांच्या हिशोब मिळावा, २३ शिक्षकांची वैयक्तिक प्रलंबित प्रस्ताव याबाबत पाठपुरावा करण्यात आला. वरील सर्व कामांचा आढावा घेऊन ३१ ऑगस्ट पर्यंत पीएफ पावत्यांसह इतर सर्व कामे मार्गी लावण्याचे आश्वासन

माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ.भाऊसाहेब कारेकर यांनी दिले.पुणे जिल्ह्यामध्ये विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी विविध कार्यक्रम आयोजित करावे, पुणे जिल्ह्यातील निवडक शाळांची तपासणी करावी, माध्यमिक शाळातील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचाही गुणगौरव व्हावा यासाठी गुणगौरव शिक्षक परिषद सहकार्य करेल असे आश्वासन जिल्हाध्यक्ष निलेश काशिद यांनी दिले.

माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ.भाऊसाहेब कारेकर यांनी पुणे माध्यमिक शिक्षण विभागात केलेल्या प्रशंसनीय बदलाबाबत तसेच गुणवत्ता संवर्धन अभियान संपूर्ण जिल्ह्यात राबवून संपूर्ण महाराष्ट्राला दिशादर्शक उपक्रम दिल्याबद्दल शिक्षक परिषदेचे विभाग कोषाध्यक्ष महेश शेलार व जिल्हा कार्यवाह शिवहार लहाने यांनी साहेबांचे अभिनंदन करण्यात आले.

या सहविचार सभेसाठी पुणे विभाग शिक्षक मतदार संघाचे माजी आमदार भगवानराव साळुंखे, डेक्कन एज्युकेशनचे संचालक अमित कुलकर्णी,राज्य कार्याध्यक्ष गुलाबराव गवळे,संजय सातपुते,महेश शेलार, संजीव मांढरे,अंजली गोरे,रामदास अभंग,पुणे जिल्हाध्यक्ष निलेश काशिद, जिल्हा कार्यवाह शिवहार लहाने, जिल्हा कोषाध्यक्ष भाऊसाहेब खोसे,उपाध्यक्ष अरविंद गवळे,



अशोक कराड, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सुभाष देवकाते, सुभाष मोरे, पुणे शहराध्यक्ष विष्णू मोरे तसेच तालुकाध्यक्ष बाळासाहेब लामखडे,विजय साळवे,लतीफ शेख,राम कदमबांडे, अरुण खेडकर, विजय पिलाने, विकास घुले,देवराम पारिठे , ज्ञानेश्वर सस्ते, प्रशांत बेंगळे व परिषदेचे बहुसंख्य पदाधिकारी तसेच अधीक्षक मंगेश कदम उपस्थित होते.

ही सहविचार सभा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. जिल्हा कोषाध्यक्ष भाऊसाहेब खोसे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# "वृक्ष लागवड ही काळाची गरज; विद्यार्थ्यांना प्रोत्साहनासाठी बक्षिसांची घोषणा" : पत्रकार सचिन रानडे

## "मुळे परिवाराचा उपक्रम समाजासाठी आदर्श; विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे संस्कार मिळतील" — पत्रकार प्रविण पोकळे

## "अन्नदान व वृक्षारोपणातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक चैतन्य; शाळेत असे उपक्रम सातत्याने राबवावेत" : पत्रकार शरद रेडेकर

## वृक्षारोपण व अन्नदानातून मुलांचा वाढदिवस; मुळे दाम्पत्याचा प्रेरणादायी उपक्रम

**आष्टी (प्रतिनिधी)**





वाढदिवस म्हणजे केक कापणे, फटाके किंवा मोठा खर्च अशी सर्वसाधारण संकल्पना असताना, आदित्य मुळे व अंकिता मुळे यांच्या वाढदिवसानिमित्त मुळे दाम्पत्याने सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा आगळावेगळा उपक्रम राबविला.

श्री दत्त शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पारेश्वर प्राथमिक शाळा, आष्टी येथे विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेच्या परिसरात १०० वृक्षांची लागवड करून मुलांचा वाढदिवस समाजोपयोगी आणि प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यात आला. या उपक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी मनापासून कौतुक केले.

यावेळी सचिन रानडे म्हणाले, "पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. मुळे दाम्पत्याने मुलांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि अन्नदानाचा स्तुत्य उपक्रम राबविला आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुढील वर्षी वृक्षसंवर्धन स्पर्धा घेऊन प्रथम क्रमांकास १,०००, द्वितीय ५०० आणि तृतीय ३०० चे बक्षीस देण्यात येईल."

पत्रकार प्रवीण पोकळे यांनी मुळे परिवाराच्या उपक्रमाचे कौतुक करत अशा समाजोपयोगी उपक्रमांचा इतरांनीही आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरण, समाजसेवा आणि संस्कारांचे महत्त्व समजण्यास मदत होईल, तसेच शाळेच्या चांगल्या कार्याला प्रसिद्धी देण्यासाठी आपण कायम सहकार्य करू, असे त्यांनी सांगितले.

पत्रकार शरद रेडेकर यांनी पारेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे कौतुक करत शाळेत अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची परंपरा कायम राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. मुळे दाम्पत्याने अन्नदान व वृक्षारोपणाचा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण केली, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खंडूदादा जाधव होते. प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शक सूर्यकांत मोकाशे उपस्थित होते. यावेळी पत्रकार प्रवीण पोकळे, सचिन रानडे, शरद रेडेकर, कपिल अग्रवाल, जयदेव ढोबे, सविन मोकाशे, आसाराम सानप, अमोल निकाळजे, घोडके सर, प्रकाश गडदे, नाना धस, सोनटक्के सर, शेकडे सर, भोसले सर, खंडागळे सर, दरेकर सर, साबळे सर, अजित मुळे, श्रीमती मुळे, श्रीमती पवार, श्रीमती गोरे व श्रीमती भवर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी राख यांनी केले.

वाढदिवसासारख्या आनंदाच्या क्षणांना सामाजिक जाणीव, पर्यावरण संरक्षण आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या आपुलकीची जोड देणाऱ्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, विद्यार्थ्यांनीही वृक्षसंवर्धनाचा संकल्प करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

---

# आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पुढाकारातून पिंपरी येथे आरोग्य शिबिर; 80 रुग्णांची तपासणी, दुर्धर रुग्णांना 6 जुलैच्या कॅम्पसाठी संदर्भित

**प्रतिनिधी | सोपान पगारे**



आष्टी तालुक्यातील पिंपरी आष्टी येथे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पुढाकारातून आरोग्य विभागाच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण 80 रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिरात समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. आरती गिते, आरोग्य सेवक श्री. हरकर आणि आरोग्य सेविका श्रीमती. भोसले यांनी रुग्णांची सखोल तपासणी केली.

### ■ दुर्धर आजारांचे निदान

तपासणीदरम्यान किडनी ट्रान्सप्लांट, मोतीबिंदू, मणका ऑपरेशन, अपेंडिक्स यांसारख्या दुर्धर आणि गंभीर आजारांचे निदान करण्यात आले. निदान झालेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी दि. 6 जुलै 2026 रोजी होणाऱ्या विशेष कॅम्पसाठी संदर्भित करण्यात आले आहे.

### ■ मान्यवरांची उपस्थिती

शिबिराला लोकनियुक्त सरपंच अशोक नाना पवार, माजी सरपंच रोहिदास पवार, ग्रामसेवक आगाशे साहेब, सामाजिक कार्यकर्ते सचिन पवार* आणि सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी आमदारांच्या पुढाकारातून होणाऱ्या या आरोग्य उपक्रमाचे कौतुक केले.

शिबिराला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. अशा प्रकारचे शिबिर नियमितपणे घेऊन ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. शिबिर यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

# आष्टी तालुक्यात युरिया खताची चढ्या भावाने विक्री; बळीराजा आर्थिक अडचणीत, कृषी विभाग निद्रावस्थेत?

## शासकीय दरापेक्षा तब्बल १५० ते २०० रुपये जास्त;

## निसर्गाच्या अवकृपेनंतर आता कृषी सेवा केंद्रांकडून शेतकऱ्यांची उघडपणे लूट

**आष्टी | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होऊन दीड महिन्याचा कालावधी उलटला तरी आष्टी तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. दररोज किरकोळ हजेरी लावणाऱ्या पावसामुळे पाणीसाठ्यात कोणतीही वाढ झालेली नाही. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांनी धाडस करून पिकांची पेरणी उरकली आहे. मात्र, आता पिकांच्या आणि चारा पिकांच्या वाढीसाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या युरिया खताची तालुक्यात तुटवडा दाखवून चढ्या भावाने विक्री केली जात असल्याने शेतकरी पुरते त्रस्त झाले आहेत.

शासकीय नियमानुसार २६८ रुपयांना मिळणारी युरियाची गोणी कृषी सेवा केंद्रांवर शेतकऱ्यांना चक्क ४०० ते ५०० रुपयांपर्यंत विकली जात असल्याचे समोर आले आहे. आधीच निसर्गाच्या अवकृपेमुळे आणि पावसाच्या प्रतीक्षेमुळे संकटात सापडलेला बळीराजा आता कृषी सेवा केंद्र चालकांच्या या नफेखोरीमुळे आर्थिक अडचणीत सापडला आहे. वास्तविक पाहता खते आणि रासायनिक औषधांच्या विक्रीवर, त्यांच्या साठ्यावर तसेच दरावर कडक नियंत्रण ठेवण्याची व काळाबाजार रोखण्याची मुख्य जबाबदारी कृषी विभागाची आहे. परंतु, तालुक्यात उघडपणे होणाऱ्या या अनधिकृत दरवाढीकडे आणि शेतकऱ्यांच्या उघड्या डोळ्यांनी होणाऱ्या लुटीकडे कृषी विभाग पूर्णपणे डोळेझाक करत आहे. त्यामुळे 'आष्टी तालुका कृषी विभाग नेमका काय करत आहे, तो झोपला आहे का?' असा संतप्त सवाल तालुक्यातील सर्वसामान्य शेतकरी उपस्थित करत आहेत.

> ### दोषींवर कारवाई करा
>
> आष्टी तालुक्यामध्ये शासनाने ठरवून दिलेल्या भावापेक्षा युरिया खताची चढ्या भावाने विक्री होत आहे. या गोष्टीकडे आष्टी कृषी अधिकारी कार्यालयाने लक्ष देणे गरजेचे आहे. आतापर्यंत तालुक्यात चांगला पाऊस झालेला नसला तरी शेतकऱ्यांनी पेरण्या केलेल्या आहेत अशा परिस्थितीत चढ्या भावाने युरिया खत विक्री करणाऱ्या कृषी केंद्र चालकांवर कृषी विभागाने कारवाई करावी.
>
> - कैलास दरेकर, मनसे शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष

---

# राजेवाडीच्या सुपुत्राच्या कल्पकतेला राष्ट्रीय मान्यता; प्रा. डॉ. परमेश्वर गडकर यांना डिझाईन पेटंट

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**



संशोधन, नावीन्य आणि सर्जनशीलतेचा संगम घडविणाऱ्या एका उल्लेखनीय कामगिरीची नोंद झाली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे राजेवाडी गावचे भूमिपुत्र प्रा.डॉ.परमेश्वर संभाजी गडकर हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नीत समाज शिक्षण मंडळ संचलित अम्रतेश्वर महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाचे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आत्तापर्यंत विविध विषयांवर शोधनिबंध संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके लिहिली आहेत. त्यांनी विकसित केलेल्या "ॲटोमेटेड इकॉनॉमिक ट्रेंड ॲनालीसीस डीव्हाईस" या अभिनव डिझाईनला भारत सरकारच्या पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्क महानियंत्रक कार्यालयाकडून (CGPDTM) अधिकृत डिझाईन पेटंट मंजूर झाले आहे. या मान्यतेमुळे त्यांच्या डिझाईनला कायदेशीर संरक्षण मिळाले असून, नाविन्यपूर्ण संशोधन क्षेत्रात त्यांच्या कार्याला राष्ट्रीय स्तरावर महत्त्वाची दखल मिळाली आहे.

प्रा.डॉ.परमेश्वर गडकर यांनी दीर्घकाळाच्या अभ्यास, संशोधन आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांतून हे डिझाईन विकसित केले. त्यानंतर भारतीय पेटंट कार्यालयाकडे त्याची नोंदणी करण्यात आली. संबंधित डिझाईनची मौलिकता, वैशिष्ट्यपूर्ण रचना आणि कायदेशीर निकषांची सखोल तपासणी केल्यानंतर भारतीय पेटंट कार्यालयाने "Automated Economic Trend Analysis Device" डिझाईन पेटंट मंजूर केले.डिझाईन पेटंट मिळणे म्हणजे संबंधित डिझाईनच्या मूळ स्वरूपाचे संरक्षण करण्याचा विशेष कायदेशीर अधिकार प्राप्त होणे होय. त्यामुळे या डिझाईनचा अनधिकृत वापर, नक्कल किंवा व्यावसायिक गैरवापर रोखण्यासाठी कायदेशीर संरक्षण उपलब्ध झाले आहे. संशोधक आणि डिझायनर्ससाठी ही मान्यता अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाते.

या यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रा.डॉ.परमेश्वर गडकर म्हणाले, "नाविन्यपूर्ण कल्पनेवर विश्वास ठेवून सातत्याने केलेल्या प्रयत्नांचे हे फलित आहे. भारतीय पेटंट कार्यालयाकडून माझ्या डिझाईनला अधिकृत मान्यता मिळाल्याचा मनापासून आनंद आहे. या यशामुळे भविष्यात अधिक संशोधन करण्याची प्रेरणा मिळाली आहे."

त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवर, सहकारी, मित्रपरिवार आणि मौजे राजेवाडी येथील गावकरी तथा प्रतिष्ठित नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील डोंगर-दऱ्यांत वसलेल्या राजेवाडी गावचे भूमिपुत्र प्रा. डॉ. परमेश्वर गडकर यांनी यापूर्वीही शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रात अनेक उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या शैक्षणिक वाटचालीतील प्रत्येक यश ही राजेवाडी गावासाठी अभिमानाची बाब ठरली असून, त्यांनी विकसित केलेल्या "ऑटोमेटेड इकॉनॉमिक ट्रेंड ॲनालिसिस डिव्हाईस" या डिझाईनला भारत सरकारकडून मिळालेले राष्ट्रीय डिझाईन पेटंट हे संपूर्ण गावासाठी गौरवाचा क्षण असल्याची भावना राजेवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक कदम यांनी व्यक्त केली. ग्रामीण भागातूनही संशोधन आणि नावीन्याच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करता येते, याचे प्रा. डॉ. परमेश्वर गडकर हे प्रेरणादायी उदाहरण असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्थानिक पातळीवरही संशोधन आणि नवकल्पनांना चालना देणारी ही प्रेरणादायी कामगिरी असल्याची भावना व्यक्त होत आहे. नाविन्यपूर्ण संशोधनाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने परमेश्वर गडकर यांचे हे यश महत्त्वपूर्ण मानले जात असून, ग्रामीण भागातील तरुण संशोधकांसाठी ते प्रेरणादायी ठरणार आहे.

---

# अमडापूर लघु प्रकल्पाची चौकशी टाईम बॉण्ड करण्यात यावी- ॲड.सचिन नाईक

## मागणीकडे दुर्लक्ष केल्यास जिल्हा कॉंग्रेस कमिटीचा आंदोलन छेडण्याचा इशारा

**महागाव | प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील फुलसावंगी परिसरातील अमडापूर लघु प्रकल्पाची शासनाने सन १९९१ मध्ये मान्यता देऊन प्रकल्पाची सुरुवात केली आहे, मान्यतेनुसार १७३७ हेक्टर सिंचन कॅनॉलद्वारे होण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते, सन २००० पासून प्रकल्पामध्ये पाणीसाठा सुरू करण्यात आला आहे, मागील २६ वर्षापासून लाभक्षेत्रातील कॅनॉलची कामे सुरू आहेत ती अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नसल्याचा ठपकाही ठेवण्यात आला असून या प्रकल्पासाठी काही जमिनी या १५ वर्षांपूर्वी संपादित झालेल्या आहेत तरी देखील अद्याप पर्यंत या कॅनॉलची निर्मिती करण्यात आलेली नाही, आज वास्तविक पाहता केवळ उद्दिष्टाच्या दहा टक्के सुद्धा सिंचन होऊ शकले नाही ही अत्यंत गंभीर बाब असल्याचा आरोप यवतमाळ जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांनी केला आहे.



तर हा प्रकल्प मूळ मान्यतेनुसार ५.३८ कोटीचा होता परंतु आज याची मान्यता २४९.३१ कोटी रुपये झालेली आहे आणि आतापर्यंत १७४ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत तरी देखील उद्दिष्टापासून हा प्रकल्प कोसो दूर आहे. त्यामुळे संबंधितांच्या जबाबदाऱ्या निश्चित होणे आवश्यक आहे. तरी आपण १४ ऑगस्ट २०२६ पूर्वी चौकशीचे आदेश द्यावेत आणि ही चौकशी टाईम बॉण्ड करण्यात यावी. सदर चौकशी ही यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प, यवतमाळ यांच्या कार्यक्षेत्राबाहेरील अधिकाऱ्यांस देण्यात यादी. असे न करण्यात आल्यास १५ ऑगस्ट पासून जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प मंडळ, यवतमाळ यांच्या कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा कांग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट सचिन नाईक यांनी निवेदनातून पाटबंधारे विभागाला दिला आहे.

---

# शिष्यवृत्ती परीक्षेत कु. राधिका मुंडेचे घवघवीत यश; मथुराई येथे मान्यवरांच्या हस्ते सत्कार

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**



शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून कु. राधिका पांडुरंग मुंडे हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर उज्ज्वल यश मिळवत गावाचे नाव उंचावले आहे. तिच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

राधिकाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तिचा मथुराई येथील निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी मार्केट कमिटीचे माजी संचालक सूर्यकांत (आप्पा) मुंडे यांच्या हस्ते तिचा सन्मान करण्यात आला.

यावेळी माजी सरपंच मोहन मुंडे, माजी सरपंच सुदाम मुंडे, पोलिस पाटील लक्ष्मण दिवटे, राजाभाऊ मुंडे, भागवत मुंडे, बाबुराव मुंडे, इंद्रमोहन मुंडे, मंचक मुंडे, वाल्मीक मुंडे, विठ्ठल मुंडे, नारायण दिवटे, गंगाधर मुंडे, रामधन मुंडे, माऊलु चव्हाण, गौतम बनसोडे, पांडुरंग मुंडे, बळीराम मुंडे, महारुद्र मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी राधिकाचे व तिच्या पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. भविष्यातही ती विविध स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करून मोठ्या पदावर पोहोचावी, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली. राधिकाची ही कामगिरी तिच्या कुटुंबासह शाळा आणि संपूर्ण गावासाठी अभिमानाची व प्रेरणादायी ठरली आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
• बीड, गुरुवार, 30 जुलै 2026

## गुरुपौर्णिमेनिमित्त पं.पू. विद्यानंद सागर महाराज यांचे आ. रमेशआप्पा कराड यांनी घेतले आशीर्वाद

**लातूर |** गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त भाजपचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी गातेगाव येथील राधाकृष्ण अध्यात्म आश्रम येथे पं.पू. विद्यानंद सागर महाराज यांची भक्तिभावाने भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी महाराजांचा यथोचित सत्कार करून गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

गुरुपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीतील पवित्र दिवस. जीवनाला योग्य दिशा, संस्कार आणि मूल्यांची शिकवण देणाऱ्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस यानिमित्ताने लातूर तालुक्यातील मौजे गातेगाव येथील राधाकृष्ण अध्यात्म आश्रमातील पं.पू. विद्यानंद सागर महाराज यांचे आश्रम येथे जाऊन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी महाराजांचे दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी महाराजांचा पांडुरंगाची मूर्ती, पुष्पहार, शाल देऊन सन्मानपूर्वक सत्कार केला.

महाराजांच्या मार्गदर्शनातून समाजात आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक मूल्यांची जपणूक होण्यास प्रेरणा मिळते, अशी भावना व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांनी गुरूंचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन हे समाज जीवनाला सकारात्मक दिशा देणारे असल्याचे नमूद केले.

यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांच्यासमवेत भाजपा किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ज्येष्ठ मार्गदर्शक नागसिंह देशमुख मालक, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, विशाल जाधव, राजकिरण साठे, भैरवनाथ पिसाळ, बाबासाहेब भिसे, किरण मुंडे, ॲड. धनराज शिंदे, समाधान अडगळे, बालाजी गवळी, संजय सूर्यवंशी, सुधाकर पाटील, अंकुश गणगे, नानासाहेब भिसे, श्रीकृष्ण मुळे यांच्यासह अनेक जण होते.



## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवशी कष्टकरी फळभाजी विक्रेत्यांना 'मायेची सावली'

# योगेश मेनकुदळे-कुलभूषण जैन यांच्या पुढाकारातून छत्री वाटप; सेवाभावातून वाढदिवसाला सामाजिक बांधिलकीची जोड





**परळी वैजनाथ |प्रतिनिधी**

परळी नगर परिषदेचे शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे आणि वैद्यनाथ बँकेचे संचालक कुलभूषणजी जैन यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्राच्या लोकनेत्या तथा मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील कष्टकरी फळभाजी व भाजीपाला विक्रेत्यांसाठी अनोखा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. उन्हाच्या कडाक्यात तसेच पावसाच्या सरींत रस्त्याच्या कडेला व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कष्टकरी बांधवांना छत्र्यांचे वाटप करून त्यांच्या दैनंदिन संघर्षाला मायेची सावली देण्यात आली. या उपक्रमाचे शहरात सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

वाढदिवस म्हटल की शुभेच्छा, सत्कार आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र, वाढदिवसाचा आनंद समाजातील कष्टकरी आणि गरजू घटकांसोबत वाटण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शहरातील विविध भागांत फळभाजी व भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांना प्रत्यक्ष भेटून छत्र्यांचे वाटप करण्यात आले. पहाटेपासून संध्याकाळपर्यंत उन्हात बसून व्यवसाय करणाऱ्या या छोट्या व्यावसायिकांना पावसाळ्यातही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अचानक येणाऱ्या पावसामुळे विक्रीचा माल भिजण्याची तसेच स्वतःचे संरक्षण करण्याचीही समस्या निर्माण होते. त्यांच्या याच दैनंदिन अडचणींची जाणीव ठेवून छत्री वाटपाचा उपक्रम हाती घेण्यात आला.

छत्री वाटपाच्या वेळी आयोजकांनी विक्रेत्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. छत्री मिळाल्यानंतर अनेक विक्रेत्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. "आमच्यासारख्या कष्टकरी लोकांचा विचार करून आमच्या उपयोगाची वस्तू देण्यात आली, ही आमच्यासाठी मोठी गोष्ट आहे," अशा भावना काही विक्रेत्यांनी व्यक्त केल्या.

यावेळी योगेश मेनकुदळे म्हणाले, "ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कष्टकरी बांधवांसाठी काहीतरी उपयोगी करता यावे, या भावनेतून हा उपक्रम राबविला. उन्हा-पावसात कष्ट करणाऱ्या विक्रेत्यांना छत्री देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, हीच आमच्यासाठी खरी समाधानाची बाब आहे." तर कुलभूषणजी जैन म्हणाले, "ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता तो समाजातील कष्टकरी आणि गरजू घटकांसोबत वाटता यावा, हा या उपक्रमामागचा उद्देश आहे. कष्टकरी जनतेच्या सेवेत केलेला हा छोटासा प्रयत्न आम्हाला मनापासून समाधान देणारा आहे."

वाढदिवसाच्या शुभेच्छांना सेवाभावाची जोड देत कष्टकरी जनतेच्या चेहऱ्यावर समाधान फुलविण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा संदेश देणारा ठरला. उन्हा-पावसात राबणाऱ्या कष्टकरी हातांना मिळालेली ही छत्री केवळ संरक्षण देणारी वस्तू न राहता त्यांच्या कष्टांची दखल घेणारी आणि आपुलकीची 'मायेची सावली' ठरली. कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे छत्री वाटपात सहभाग घेत विक्रेत्यांशी संवाद साधला. या उपक्रमात भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले.



## धार्मिक कार्यात नावंदे परिवाराच योगदान कौतुकास्पद; श्रीगुरु काशीनाथ शिवाचार्य महाराज यांचे गौरवोद्गार

**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

धार्मिक कार्यात नावंदे परिवार परचुंडी यांचे योगदान अत्यंत मोलाचे असून, गुरु मठा प्रति त्यांची अपार श्रद्धा आणि स्नेह आहे, असे गौरवोद्गार ष.ब्र.१०८ श्रीगुरु काशीनाथ शिवाचार्य महाराज (पाथरी मठ) यांनी आपल्या आशीर्वचनात व्यक्त केले.

पाथरी येथील श्री गुरु कांचबसवेश्वर मठ संस्थान येथे दिनांक 22 जुलै ते 29जुलै 2026 दरम्यान अखंड शिवनाम सप्ताह व गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला जात आहे. या निमित्ताने आजच्या दिवशी आयोजित महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन प्रेस फोटोग्राफर तथा समाजसेवक श्री भीमाशंकरआप्पा नावंदे श्री लक्ष्मणआप्पा नावंदे, वसंत नावंदे, नागनाथ नावंदे व अशोक नावंदे गुरुजी परचुंडीकर यांच्या वतीने करण्यात आले.




सकाळच्या सत्रात श्री गुरु कांचबसवेश्वर यांच्या समाधीवर अभिषेक करण्यात आला. त्यानंतर परमरहस्य पारायण, भजन ,विविध सामाजिक विषयावर श्रीगुरु काशीनाथ शिवाचार्य महाराज यांचे प्रवचन संपन्न झाले. या वेळी नावंदे परिवाराच्या वतीने श्रीगुरुंचे औपचारिक स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमास वीरशैव समाज परचुंडी व वीरशैव समाज पाथरी येथील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुसंघटित आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात हा धार्मिक सोहळा संपन्न झाला.

## टोकवाडी श्री रत्नेश्वर देवस्थान येथे गुरुपौर्णिमेनिमित्त दहीहंडी पालखी सोहळा उत्साहात संपन्न

**परळी ( प्रतिनिधी)**

प्रती वर्षी प्रमाणे, या पण वर्षी श्री रत्नेश्वर देवस्थान टोकवाडी येथे गुरु पौर्णिमा निमित्त दहीहंडी पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला.श्री रत्नेश्वर देवस्थान हे टोकवाडीचं आराध्य दैवत टोकवाडीत दहीहंडीची परंपरा पूर्वजांपासून चालत आलेली आहे. ती परंपरा पुढे तरुण पिढी समर्थपणे सांभाळत आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार डॉ.ह भ प तुकाराम महाराज मुंडे शास्त्री सोहळ्यामध्ये लहान लेकरांसारखे भक्तीमध्ये विलीन होतात. मारुती सटवाजी मुंडे हे पालखीचे नियोजन करतात. तसेच या पालखीसाठी डॉ. भरत मुंडे ( एम एस सर्जन )तुकाराम उद्धव मुंडे. संभाजी मुंडे योग प्रशिक्षक, राम मारुती मुंडे, चोपदार, मीनानाथ मुंडे विणेकरी, अनंत मुंडे , संतोष नाथराव मुंडे , नवनाथ मुंडे युवा उद्योजक , माऊली मुंडे सर , टी,डी मुंडे ,राजेश आघाव, मृदंग वादक शिवाजी मुंडे ,महादेव मुंडे गणेश मुंडे, रामधन मुंडे, पोलीस अमोल मुंडे , जगन्नाथ मुंडे मृदंग वादक, सह

सर्व भजनी मंडळातील सदस्य व भगवान बाबा गणेश मंडळातील सर्व सदस्य. आपण सर्वांनी रत्नेश्वर पालखी सोहळा यशस्वी होण्यासाठी सर्वांनी सहकार्य केले. आपल्या गावाची ही परंपरा पुढे टिकून ठेवण्याची सर्वस्व जिम्मेदारी आपल्या सर्वांवर आहे. श्री रत्नेश्वर आपल्याला शक्ती देवो हीच रत्नेश्वराच्या चरणी प्रार्थना या सोहळ्यामध्ये गावातील पुरुष, महिला युवक वर्ग उपस्थित होते.

